
|| अल्पारंभ: क्षेमकर:||

SINGLE WINDOW SERVICES

# गवाक्ष

......एक विचारमंच !

अंक : १० वा ऑक्टोबर २००६




## सिंगल विंडो सर्व्हिसेस व मुक्तांगण परिवारतर्फे आपल्याला व आपल्या कुटुंबियांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

मित्रहो,

येणारी दिपावली आपल्या कुटुंबियांस समृद्धता, ज्ञान, आरोग्य आणि आनंद घेऊन येवो, ह्या आमच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

मुक्तांगण ह्या आमच्या सॉफ्टवेअर डिव्हीजन तर्फे दिपावलीच्या शुभमुहूर्तावर आम्ही सादर करत आहोत, **'अनुभूती'** आणि **'Blue Book'** ही आमची नाविन्यपूर्ण आणि कल्पकतेने तयार केलेली दोन सॉफ्टवेअर्स !

मुक्तांगणच्या अंकात आपल्याला ह्या दोनही सॉफ्टवेअर बद्दल यथोचित माहिती मिळेलच. आपल्या दैनंदिन जीवनाशी संबंधित ही दोन्ही सॉफ्टवेअर्स आपले जीवन अधिक आनंददायी आणि सुरक्षित बनवू शकतील, ह्या बद्दल खात्री वाटते.

**– श्री. रघुवीर अधिकारी**

## करोडपती होण्याचे स्वप्न ? मग म्युच्युअल फंडात गुंतवणुक करा.

चकित झालात ? परंतु म्युच्युअल फंडात गुंतवणुक करून करोडपती होऊ शकता. ह्यासाठी आपण मागील दहा वर्षांचा अर्थात सन १९९६ ते सन २००६ ह्या काळातील काही निवडक म्युच्युअल फंडांच्या स्कीमच्या प्रगतीचा आढावा घेऊ. जर रू. २०,०००/- दरमहा सिस्टिमेटीक इन्व्हेस्टमेंट प्लान SIP मध्ये दहा वर्षात गुंतविले असते तर गुंतवणूक रक्कम रू. २४ लाख होते आता काही निवडक म्युच्युअल फंडाच्या स्कीममध्ये रू. २४ लाख किती झाले असते ते खालील तक्त्यावरून लक्षात येईल.

| अ. क्र. | म्युच्युअल फंडाच्या स्कीम चे नांव | दहा वर्षातील SIP ची रक्कम (रू. कोटी) | वार्षिक परतावा (% मध्ये) |
|---|---|---|---|
| १. | रिलायन्स ग्रोथ | २.०६ | ४०.९३ |
| २. | फ्रेंकलीन इंडिया प्राईमा | १.८७ | ३९.०५ |
| ३. | एच.डी.एफ.सी. इक्विटी | १.८१ | ३८.४६ |
| ४. | रिलायन्स विजन | १.७१ | ३७.३८ |
| ५. | फ्रेंकलिन इंडिया ब्ल्यूचिप | १.५७ | ३५.७१ |
| ६. | फ्रेंकलिन इंडिया प्राईमा प्लस | १.४५ | ३४.२५ |
| ७. | मॅग्नम ग्लोबल | १.१८ | ३०.३९ |
| ८. | प्रूडेंशियल आयसीआयसीआय पॉवर | १.१८ | ३०.३९ |
| ९. | एच.डी.एफ.सी. कॅपिटल बिल्डर | १.०५ | २८.०७ |
| १०. | यू.टी.आय मास्टर ग्रोथ | ०.७५ | २१.९९ |
| ११. | जे. एम. इक्विटी | ०.७० | २०.६४ |
| १२. | एल. आय.सी. एम.एफ. ग्रोथ | ०.५९ | १७.३२ |

संदर्भ : व्हॅल्यूरिसर्च – जुलै १५ – ऑगस्ट १४, २००६, पान नं. १९

उल्लेखित १२० महिन्यातील जवळ जवळ पाच वर्षे तेजीत व पाच वर्षे मंदिचा काळ होता. १२० महिन्यातील २८महिन्यात सेन्सेक्स ५% ने घसरला होता.

आता दुसरा तुलनात्मक अभ्यास SIP मधील गुंतवणूक १२० महिन्यात प्रति महिना रू. २०,०००/- ऐवजी ६० महिन्यात SIP मधील गुंतवणूक प्रति महिना रू. ४०,०००/- केली असती तर काय होईल हे पाहू या.

| | | एकुण गुंतवणूक | रिलायन्स ग्रोथ मध्ये वाढ |
|---|---|---|---|
| १. | १२० महिन्यात (SIP) मध्ये दरमहा गुंतवणूक रू. २०,०००/- | रू. २४ लाख | २.०६ कोटी |
| २. | ६० महिन्यात SIP मध्ये दरमहा गुंतवणूक रू. ४०,०००/- | रू. २४ लाख | १.०६ कोटी |

वरील अभ्यासावरून बोध घेऊन आपण आपली गुंतवणूक खालील प्रकारे करावी.

१. तीन ते पाच निवडक इक्विटी स्कीम मध्ये गुंतवणूक करावी.
२. तेजी मंदीच्या चक्रात न अडकता दीर्घ मुदतीसाठी अर्थात दहा वर्षे व त्यापेक्षा अधिक काळासाठी गुंतवणूक करावी.
३. एकरकमी गुंतवणूक न करता SIP द्वारे नियमित ठराविक रक्कम गुंतवावी.

**– प्रमोद वकील**

## ''राष्ट्रभाषा – हिन्दी ''

'' विचारोंकी अभिव्यक्ति के लिए ध्वनि संकेतों का व्यवहार होता है। वे ही भाषा कहलाते हैं। इसके अनुसार भाषा के चार स्कन्द माने जा सकते हैं। श्रोता, वक्ता, शब्द और अर्थ। भाषा एक सामाजिक क्रिया है, जिसमें वक्ता और श्रोता दोनोंको महत्त्व दिया जाता है, क्योंकि यह उनके विचार विनिमय का साधन है। देश की संस्कृति और सभ्यता के विकास में भाषा का महत्त्वपूर्ण योग रहा है।

भाषा जब समूचे राष्ट्र की समस्त विभाषाओं पर अपना एक छत्र राज्य करती है तो ''राष्ट्र भाषा'' कहलाती है। राष्ट्रभाषा और विभाषा में अन्तर यह है की विभाषा कि सीमा भूगोल स्थिर करता है और राष्ट्रभाषा की सीमा सभ्यता, संस्कृति और जातीय भावों पर निर्भर है। आज भारत में पंजाबी पंजाबकी, गुजराती गुजरात की, मराठी महाराष्ट्र की विभाषाएँ हैं। मेरठ और दिल्ली की विभाषा ने सबको परास्तकर अपने आधीन कर लिया। आज वह राष्ट्रभाषा के पद पर आसीन है।

''राष्ट्रभाषा'' और हिन्दी पर संक्षिप्त विचार करने के बाद प्रश्‍न यह खड़ा होता है कि हिन्दी को राष्ट्रभाषा बनने का गौरव क्यों प्राप्त हुआ ?

इसके उत्तर में कहा जा सकता है कि हिन्दी देश की अधिकांश जनता की भाषा है। दुसरी बात है कि हिन्दी देश के अधिकांश लोगों के द्वारा बोली या समझी जाती है। अन्य प्रांतीय भाषाओं की व्यापकता हिन्दी के बहुत पीछे हैं। तिसरी बात है हिन्दी की वैज्ञानिकता। इसकी वैज्ञानिकता ने हिन्दी को सर्व सुलभ बना दिया है। यही कारण है कि देशके किसी भी कौने में रहने वाला व्यक्ति यदि हिन्दी सीखना चाहता है तो वह केवल छ:महिने ही में हिन्दी लिख व बोल सकता है।

हिन्दी की लिपि वैज्ञानिक है। क्योंकि इसका प्रत्येक वर्ण 'अ' के सहयोग से बना है। वर्णमाला का दूसरा और चौथा वर्ण 'ह' के सहयोग से बना है। यही कारण है कि हिन्दी में हम जैसा बोलते हैं वैसाही लिखते हैं।

उपर्युक्त विशेषताओं को देखकर ही संविधान निर्माताओं ने हिन्दीको राष्ट्रभाषा का गौरवशाली पद प्रदान किया है।

देश को एकता के सूत्र में बांधने के लिए देश की संस्कृति, सभ्यता, प्रगति एवं सुदृढता के लिए एक राष्ट्रभाषा का होना अति आवश्यक है। भारतवर्ष में हिन्दी एक भाषा है जो सभी दृष्टिकोण से राष्ट्रभाषा पद पर आसीन होने की अधिकारिणी है। हम सब का पावन कर्तव्य है कि माँ हिन्दी को उसकी गौरवपूर्ण स्थान प्रदान कराने के लिये हर संभव प्रयत्न करने हेतु कटिबद्ध रहें।''

**: सौ. मनिषा अधिकारी**

## Blue Book
## A Personal Record of
## What your family Should Know

Dear Friends,

**"Your Family Is Most Important To You."**

It is this element in your life that drives you to work hard, so that you can give your family a better life to lead. It is this zeal in you that pushes you every moment to create wealth for your family, so that they have a stable platform to stand upon, tomorrow.

A family for which you do so much, there remains but little important thing that needs to be done, which is documenting the records of your life in a single place that can be accessed easily by your family and which gives them details of your personal, business and investment affairs.

This software, "Blue Book" will prove a handy source of information about your Bank Accounts, Insurance, Fixed Deposits, Shares, Income Tax Records, Real Estate, Business Interest, Financial Obligations etc.

It is also a ready reckoner for you to refer to any item which remains overlooked and to which attention needs to be paid today, to prepare for a safer tomorrow.

This software, Blue Book also prompts you to take inventory of your Estate (i.e. assets) and to list important information such as Names of your Advisors, List of your Properties, Employee Benefits, Location of important papers and documents

There are certain details, which you will need to review frequently, to keep the information relevant and correct. You might need to record certain information, which is changeable in nature and record updated information over it.

We All believe in life but yet we are aware that it isn't there around always. So, we will prepare for the lives that will continue after our life.

This software in conceived and published with one single-thought behind it, which is that

**"Your Family is Most Important To Us Too ."**

With best regards and best Wishes....Muktangan.



१५, १६ जुलै ०६ :
कला प्रदर्शनाचे आयोजन






१९ एप्रिल ०६ : गुडिपाडव्याच्या शुभमुहूर्तावर मुक्तांगण या खुल्या व्यासपीठाचे उद्घाटन

१५, १६ जुलै ०६ : मुक्तांगणतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन





३१ जानेवारी ०६ :
महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा, नाशिक यांचे ट्रेनिंग वर्कशॉप



८ एप्रिल, ०६ : श्री. रघुराज देशपांडे यांचे 'क्रिएटिव्हीटी' या विषयावर मुक्तांगण सभासदांना मार्गदर्शन

वर्ष २००५ : "Upper Crust Award"
एच.डी.एफ.सी. म्युच्युअल फंड मध्ये केलेल्या कामगिरीबद्दल राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार 'सन्मान २००५'



१ ऑगस्ट ०६ : जनकल्याण रक्तपेढी तर्फे जुलै महिन्यातील सर्वाधिक रक्तसंकल केल्याबद्दल मुक्तांगणचा सत्कार





३ सप्टेंबर ०६ : राष्ट्रपतींचे ए.डी.सी. श्री. अंकुर नाईक यांची मुक्तांगणला सदिच्छा भेट व बाल सदस्यांना मार्गदर्शन

२ ऑक्टोबर ०६ : सिंगल विंडो सर्व्हिसेस : इंदिरानगर शाखेचे दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर उद्घाटन



२ ऑक्टोबर ०६ :
सिंगल विंडो सर्व्हिसेसचा स्टाफ



या अंकातील सर्व छायाचित्रे प्रसाद पवार यांची आहेत.

# "गप्पा आजोबांशी"

'दसरा सण मोठा, नाही आनंदा तोटा, असं म्हटलंय', आजोबा म्हणाले.

'दसऱ्यानंतर दिवाळी' अद्वैत म्हणाला.

'बरोबर'

'आजोबा, दिवाळीचं महत्त्व सांगा ना' पराग म्हणाला.

'आपले सर्वच सण आनंद व्यक्त करण्याचे आहेत. तसाच दिवाळी सण. पावसाळा पसार झालेला असतो. शेतातलंपीक घरात आलेलं असतं. त्यामुळे शेतकरी खूष असतो. थंडीची सुरूवात झाली असते. थंडीचा मोसम म्हणजे मूर्तिमंत उत्साह, दिवाळीच्या प्रत्येक दिवसाचं वैशिष्ट्य आहे...'

'ते आम्हाला सांगा' मृणाल म्हणाली.

'दिवाळी पूर्वी आपण आश्विन शुद्ध पौर्णिमेला कोजागिरी साजरी करतो. ती कोजागिरी पौर्णिमा त्या दिवशी लक्ष्मी व इंद्र या देवतांची पूजा करतात. कारण लक्ष्मी ही ऐश्वर्याची देवता तर, इंद्र ही पर्जन्याची देवता. कोजागिरीला रात्री चंद्राची पण पूजा करतात. आटीव दुधाचा नैवेद्य दाखवितात, जागरण करतात व दुग्धप्राशन करतात. या रात्री 'को जागर्ति' म्हणजे कोण जागृत आहे हे लक्ष्मी पाहत असते. कोजागिरीला ज्येष्ठ मुलाला किंवा मुलीला आई औक्षण करते. आता, दिवाळीची सुरूवात आश्विन वद्य द्वादशी पासून होते. त्या दिवसाला वसुबारस किंवा गोवत्स द्वादशी म्हणतात. या दिवशी संध्याकाळी बायका गाईची तिच्या पाडसासह पूजा करतात. या योगे घरात लक्ष्मीचे आगमन होते असा समज आहे. वसु या शब्दाचा अर्थ धन किंवा द्रव्य असा आहे. या दिवसापासून घरापुढे पणत्या लावण्यास व रांगोळी काढण्यास सुरूवात होते. नंतरचा दिवस धनत्रयोदशीचा या दिवशी व्यापारी स्वत:च्या घरी पाटावर लक्ष्मीची मूर्ती ठेऊन तिची पूजा करतात. त्यावेळी धणे व गुळ ह्यांचा नैवेद्य दाखवितात. या दिवसापासून आकाशकंदील लावायला सुरूवात करतात. आकाश कंदील बनवणे म्हणजे कलेला वावच. विविध रंगाचे, आकाराचे आकाशकंदील शोभा वाढवतात. संध्याकाळी, थोडी कणिक घेऊन त्यात तेल हळद घालून दिवा करतात. तो अंगणात दक्षिणेकडे तोंड करून ठेवतात. त्याला यमदीप म्हणतात. यमराजाची अवकृपा होऊ नये म्हणून दिव्याला हळद कुंकू वाहून पूजा करतात. नंतर येते नरकचतुर्दशी.

श्रीकृष्णाने या दिवशी नरकासुर नावाच्या राक्षसाचा वध केला. म्हणून या दिवसाला नरकचतुर्दशी असे म्हणतात. या दिवशी अंगाला सुगंधी उटणे, सुवासिक तेल लावून सूर्योदयापूर्वी आंघोळ करतात. कणकीचा दिवा लावून अर्धी अंघोळ झाल्यानंतर औक्षण करतात. मुले फटाके, फुलबाज्या उडवतात. या दिवशी नव्या केरसुणीची पूजा करून ती घरात वापरायला सुरूवात करतात. नंतर कोणता दिवस येतो ?'

'अमावस्या' मृणाल म्हणाली.

'बरोबर. अमावस्या म्हणजे लक्ष्मीपूजन. व्यापारी लोकांचे नवीन वर्ष लक्ष्मीपूजनानंतर सुरू होते. या दिवशी संध्याकाळी लक्ष्मीपूजन करतात. अनारसे, बत्तासे यांचा नैवेद्य दाखवितात. या दिवशी पैसे खर्च करत नाही. कारण पैसा म्हणजे लक्ष्मी. नंतर बलिप्रतिपदा किंवा पाडवा म्हणजे कार्तिक शुद्ध प्रतिपदा. हा दिवस साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त आहे असे मानतात. विष्णूने बळी राजाला वर दिला होता की या दिवशी लोक तुझ्या नावाने आनंद व्यक्त करतील. या दिवशी मुलगी वडलांना, पत्नी पतीला ओवाळते. ते त्यांना भेटवस्तू किंवा पैसे देतात. दुसरा दिवस कार्तिक शुद्ध द्वितीया किंवा भाऊबीज. या दिवशी यमराजाच्या बहिणीने भावाला म्हणजे यमाला जेवायला बोलावले. म्हणून या दिवसाला यमबीज पण म्हणतात. या दिवशी भाऊ बहिणीला भेटायला जातो. ती भावाला ओवाळते. भाऊ तिला प्रेमाचे प्रतिक म्हणून भेटवस्तू किंवा पैसे देतो. असा हा चार दिवसांचा दिवाळीचा आनंदाचा सण....'

'आजोबा, छान माहिती सांगितली' पराग म्हणाला.

'दिवाळीत एकमेकांना आपल्या घरी फराळाला बोलावतात. शुभेच्छा देतात. या निमित्ताने नातेवाईक एकत्र जमतात. दिवाळी म्हणजे नवे कपडे, फराळाचे पदार्थ, फटाके, मजाच मजा, नाही का? दिवाळी म्हणजे प्रेमाचा, प्रकाशाचा, मांगल्याचा सण, दिवाळीचा आनंद आपणाला वर्षभर पुरतो. म्हणून एक कवी म्हणतो,

आली दिवाळी, गड्यांनो आली दिवाळी,
रोज रोज शाळा, पुरे ती आला कंटाळा,
चार दिवस आता, मनाला कसली ना चिंता,
उडू बागडू जसी पाखरे स्वैर अंतराळी,
फारच गमतीचे, खरोखर दिवस दिवाळीचे....'

**बा. ल. शुक्ल**


॥ अल्पारंभ: क्षेमकर: ॥

SINGLE WINDOW SERVICES

खाजगी वितरणासाठी

Comprehensive Financial Consultancy

समावेशक आर्थिक सल्लागार

-:Head Office :
3,4, Kamal Residency, Behind Patil Lane No.4,
College Road, Nashik - 422 005.
Ph.: (0253) 2579993, 2317867, 2309480.
Website : www.singlewindowservices.com

-: Indira Nagar :-
Sandeep Deshmukh
Mobile : 9822408093

-: Ahmednagar Branch :-
SANJAY KULKARNI
Mobile : 9860046338.

-: Indore Branch :-
Amlendu Sharma
Mobile : 9826211439

-: Jalgaon Branch :-
Deepak Kulkarni
Mobile : 9881242210

-:Chalisgaon Branch :-
Sachin Purkar
Mobile : 9373900533 /9226174249